## विशेष सभा

**महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५चे कलम ५१अ- १अ नुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम,२०१० व (सुधारणा २०१२,२०१९) अन्वये नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करणे,करिता घ्यावयाची विशेष सभेची नोटीस**

**वाचा** :-

१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ (१) (ब) व ५१ (ब)(२), कलम ४८

२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अहर्ता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम, २०१०

३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अहर्ता व नियुक्त्या करण्याची पध्दत) (सुधारणा) नियम, २०१२

४) शासन नगरविकास विभाग परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.४६६/नवि-२०, दि. २१ डिसेंबर, २०१६

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग क्रमांक ३८ शुक्रवार, ३१ मे २०१९

६) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग एक-अ-पुर्ण विभागीय पुरवणी, असाधारण क्र. २४, दि. २३ डिसेंबर, २०२५

७) सातारा नगरपरिषदेच्या नामनिर्देशित सदस्य निवडीसाठी पिठासन अधिकारी म्हणून कार्यवाही करणेबाबत मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा यांचे पत्र क्र.साशा/(सातारा न.प.नाम.सदस्य) निवड/आदेश/ COLSAT- 38/194/2026 दि.१२/१०/२०२६

८) सातारा नगरपरिषद, सातारा. नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीसाठी प्राप्त शिफारस पत्र व अहर्तचे पुरावे यांची छाननी करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचे पत्र क्र. नपप्रसशा/सातारा न.प./नाम.स. निवड/ कावि८ COLSAT-38/194/2026 दि. १२/१०/२०२६

---

जा.क्र./सा.न.प./सभा.का.वि./११५/२०२६
दिनांक :-१९/१०/२०२६

**प्रति,**

**श्री./श्रीमती ------------------------------------------------------**
**सन्माननीय सदस्य/सदस्या,**
**सातारा नगरपरिषद, जि. सातारा.**

ज्याअर्थी सातारा नगरपरिषदेचे नामनिर्देशित सदस्य श्री. शंकर रामचंद्र माळवदे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे सादर केला आहे व तो मा.जिल्हाधिकारी, सातारा यांनी मंजूर केला आहे. त्यामुळे नामनिर्देशित सदस्याचे एक पद रिक्त झाले आहे. त्याअर्थी नामनिर्देशित सदस्य यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

उक्त वाचा:- १ ते ८ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१अ - १ अ व इतर सर्व अनुषंगिक तरतुदी नुसार मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन मी श्री. अमोल उदयसिंह मोहिते अध्यक्ष, सातारा नगरपरिषद या नोटीशीद्वारे, सातारा नगरपरिषदेच्या सर्व सदस्यांना कळवितो की, वर उल्लेख केलेप्रमाणे नामनिर्देशित सदस्य यांचे एक पद नामनिर्देशनाने भरणे प्रयोजनासाठी सातारा नगरपरिषदेची

विशेष सभा शुक्रवार दि. ३०/१०/२०२६ रोजी सकाळी ११:३० वा. सातारा नगरपरिषद, १ केसरकर पेठ सातारा येथील श्री. छ. शिवाजी महाराज सभागृहात घेण्यात येणार आहे. या विशेष सभेमध्ये पुढील नमूद केलेप्रमाणे कामकाज होईल.

**नामनिर्देशित सदस्यांची नियुक्तीची कार्यपध्दती :-**

नगरपरिषदेमधील नोंदणीकृत / मान्यता प्राप्त पक्ष / आघाडीच्या संख्या बळाच्या प्रमाणात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) नियम, २०१० महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पध्दत) (सुधारणा) नियम २०१२ व २०१९ नुसार

१) संबंधित पक्ष/गट/आघाडी प्रमुख सदस्याचा नामनिर्देशन अर्ज सभेच्या दिनांकापूर्वी किमान २४ तास आधी मा. जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे मार्फत मा. पदनिर्देशित अधिकारी (उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा) यांचेकडे छाननीसाठी दाखल करेल.

२) संबंधित पक्ष/गट/आघाडी प्रमुख यांचे कडून प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्ज व शिफारस पत्र व अर्हतेचे पुरावे यांची छाननी मा. पदनिर्देशित अधिकारी (उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा) करतील.

३) पदनिर्देशित अधिकारी प्राप्त नामनिर्देशन पत्र, शिफारस पत्र व अर्हतेचे पुरावे याची छाननी करुन अर्हता प्राप्त उमेदवारांची यादी संबंधित पक्ष/गट/आघाडी प्रमुख यांचेकडे पाठवून त्याची लेखी स्वरुपात प्रत मा.पिठासीन अधिकारी (नगराध्यक्ष) यांच्याकडे बैठकीपूर्वी पाठवेल.

४) विशेष सभेमध्ये मा. पिठासीन अधिकारी (नगराध्यक्ष) हे मा. पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडून लेखी स्वरुपात प्राप्त अर्ह उमेदवाराचे नाव घोषित करुन नामनिर्देशित सदस्य पदी निवड जाहिर करतील.

**ब) नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे**

| अ. क्र. | कार्यक्रम | तारीख व वार | वेळ |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती, नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करणेची पध्दत नियम, २०१० व ( सुधारणा नियम २०१२ व २०१९) नुसार नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे. | दि. ३०/ १०/२०२६ (शुक्रवार) | सकाळी ११ :३० वाजता |

**स्थळ :- सातारा**

(अमोल उदयसिंह मोहिते)
पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष
सातारा नगरपरिषद, सातारा